◆ बुलडाणा ◆ वर्ष - 3 ◆ अंक - २२६ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम

दैनिक गुरुवार १८ सप्टेंबर २०२५

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

# बातमी जगत

**TRENDING NEWS**

अमेरिकन अभिनेत्री सिडनी स्वीनी बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार:इंडस्ट्रीकडून 530 कोटींची ऑफर मिळाली, आतापर्यंतचा सर्वात



■पान 3 वर

## थोडक्यात

### खंडणीची मागणी

**यवतमाळ :** खंडणीची मागणी करून जिवे मारण्याची धमकी दिल्यावरून गुन्हा नोंद करण्यात आला. याप्रकरणी फिर्यादी हे लोकांना बधाई (भिक्षा) मागत असतांना आरोपी हे तेथे येवुन फिर्यादीस आम्हाला नियमीत एक लाख रूपये हप्ता (खंडणी) द्या असे म्हटल्याने फिर्यादीने त्यांना नकार दिल्याने शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना आर्णी रोडवरील गुरूव्दारा समोर घडली. याप्रकरणी सनाबाई गुरू नाजणी नायक यांच्या तक्रारीवरून संदीप उर्फ मुस्कान कसनदास चव्हाण व इतर तिघांविरूध्द गुन्हा नोंद केला.

### धक्का लागल्यावरून वाद

**यवतमाळ :** लोहारा चौक यवतमाळ येथे धक्का लागल्यावरून वाद केला. याप्रकरणी फिर्यादीचा धक्का लागल्याच्या कारणावरून वाद करून शिविगाळ केली व हातील कड्याने हनुवटीवर तसेच डाव्या कानावर मारून जखमी केले. ही घटना १५ सप्टेंबर रोजी घडली. याप्रकरणी गजानन ज्ञानेश्वर तपासे यांच्या तक्रारीवरून अभिषेक चोकडे पुर्ण नाव माहिती नाही विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जागेच्या कारणावरून वाद

**राळेगाव :** जागेच्या कारणावरून वाद केल्याची घटना घडली. याप्रकरणी वलिनगर येथे फिर्यादी सोबत जागेच्या कारणावरून वाद करून शिविगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवून काठीने डाव्या हातावर मारून हात फॅक्चर केला. याप्रकरणी इंदु मारोती कुमरे यांच्या तक्रारीवरून भास्कर किनाके विरूध्द गुन्हा नोंद केला.

### युवकावर चाकुने हल्ला

**यवतमाळ :** युवकावर चाकुने हल्ला करून जखमी केल्याची घटना हनुमान मंदीराजवळ पिंपळगाव येथे घडली. याप्रकरणी घटनास्थळी उभे असेल्या युवकाला आरोपीने दुचाकीवरून येवुन फियादीस हाच लाप्याचा भाऊ होय याला उचला असे म्हणून गालावर थापडाबुक्याने मारहाण करीत असतांना तुम्ही मला का त्रास देत आहे असे म्हटले असता फिर्यादीस शिविगाळ करून जिवाने मारण्याच्या उद्देशाने चाकुने हल्ला करून जखमी केल. याप्रकरणी रोहीत बंडु पवार यांच्या तक्रारीवरून रोशन भांडेकर, हर्षु रायडर, ओम डोंगे, आदित्य लोटे विरूध्द गुन्हा नोंद केला.

# देशभरात बिहारप्रमाणे SIR होईल

## अर्ध्याहून अधिक मतदारांना कागदपत्रे मागणार नाही, 1987नंतर जन्मलेल्यांना पालकांची कागदपत्रे द्यावे लागतील

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**मुंबई :** निवडणूक आयोगाने (EC) बुधवारी सांगितले की, बहुतेक राज्यांमधील अर्ध्याहून अधिक मतदारांना विशेष सघन पुनरावृत्ती (SIR) दरम्यान कोणतेही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही कारण त्यांची नावे मागील SIR च्या मतदार यादीत समाविष्ट आहेत.

पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, शेवटचा एसआयआर प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या वर्षांत करण्यात आला होता. बहुतेक ठिकाणी ही प्रक्रिया २००२ ते २००४ दरम्यान झाली. ज्यांची नावे त्यावेळी मतदार यादीत होती त्यांना त्यांची जन्मतारीख किंवा जन्मस्थान सिद्ध करण्यासाठी कोणतीही नवीन कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. उदाहरणार्थ, बिहारमध्ये, २००३ च्या एसआयआर यादीचा वापर मतदानासाठी आधार म्हणून करण्यात आला. त्या यादीत सुमारे ५ कोटी मतदार (६०%) आधीच नोंदणीकृत होते, त्यामुळे त्यांना कोणतेही अतिरिक्त कागदपत्रे देण्याची आवश्यकता नव्हती. सुमारे ३ कोटी नवीन मतदारांना (४०%) ११ विहित कागदपत्रांपैकी एक कागदपत्र देण्यास सांगण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, आधार कार्ड देखील १२ वे कागदपत्र मानले गेले. दिल्लीची मागील एसआयआर यादी २००८ ची आहे आणि उत्तराखंडची २००६ ची आहे, जी आता राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी (मुख्य निवडणूक अधिकारी) यांच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. निवडणूक आयोग सर्व राज्यांमध्ये एकाच वेळी एसआयआर आयोजित करू इच्छित आहे. तथापि, बिहारमध्ये मिळालेल्या अनुभवाच्या आधारे, आयोग त्यांच्या कार्यपद्धतींमध्ये काही सुधारणा देखील करेल. आयोगाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मतदार फॉर्म भरण्यासाठी, दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी आणि कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर मसुदा आणि अंतिम मतदार याद्या जारी करण्यासाठी एक वेळापत्रक देखील तयार केले जाईल.

### राज्यांना तयारी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत

राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना तयारी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तारीख जाहीर होताच संपूर्ण कर्मचारी काम करण्यास सज्ज होतील. २००५ मध्ये आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये सखोल आढावा घेण्यात आला. उर्वरित राज्यांमध्ये २००२-०३ मध्ये ते घेण्यात आले. २००६-०७ मध्ये महाराष्ट्र आणि अरुणाचल प्रदेशमध्ये आणि २००८ मध्ये दिल्लीमध्ये सखोल आढावा घेण्यात आला.

### बिहारमध्ये १२ कागदपत्रे वैध आहेत

सुरुवातीला, बिहारच्या एसआयआरमध्ये ११ कागदपत्रे स्वीकारण्यात आली होती. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर, आधार क्रमांकाला १२ वे कागदपत्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. आयोगाच्या सूत्रांनुसार, या १२ कागदपत्रांव्यतिरिक्त, राज्यांच्या वैशिष्ट्यांनुसार काही कागदपत्रे जोडली किंवा काढून टाकली जाऊ शकतात. यासाठी राज्यांकडून इनपुट मागवण्यात आले आहे. सूत्रांचा असा दावा आहे की, बिहारच्या एसआयआरपासून धडा घेत, ही वेळ वाढवता येऊ शकते. उदाहरणार्थ, मतदार अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० ऐवजी ४५ दिवसांपर्यंत वाढवता येऊ शकते. शिवाय, मसुदा मतदार यादीवरील दावे आणि आक्षेप स्वीकारण्यासाठीही तेवढाच वेळ दिला जाऊ शकतो. कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी एक महिना पुरेसा असेल. परिणामी, संपूर्ण एसआयआर प्रक्रिया चार ते पाच महिन्यांत पूर्ण होऊ शकते.

# मनोज जरांगे पाटलांनी दिला 'चलो दिल्ली'चा नारा

## राठा समाजाचे अधिवेशन राजधानीत घेण्याची केली घोषणा, लवकरच तारीख होणार जाहीर

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**धाराशिव :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण केले होते. त्यानंतर राज्य सरकारने मनोज जरांगेंच्या 8 मागण्यांपैकी 6 मागण्या मान्य करत हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी जीआर काढला. हा मराठा समाजासाठी मोठा विजय मानला जात आहे. तसेच राज्यात लवकरच सातारा गॅझेट देखील लागू होण्याची शक्यता आहे. आता मनोज जरांगे यांनी राजधानी दिल्लीत जाणार असल्याची घोषणा केली आहे.

मनोज जरांगे यांनी चलो दिल्लीचा नारा दिला असून, मराठ्यांचे वादळ दिल्लीत धडकणार आहे. देशभरातील मराठा समाजाचे दिल्लीत अधिवेशन घेणार आहेत. लवकरच या अधिवेशनाची तारीख जाहीर करण्यात येणार आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी नंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचे अधिवेशन होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे. दरम्यान, मराठा आरक्षणासाठी मुंबईत मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला मोठे यश आले आहे. लाखो मराठा बांधवांनी या आंदोलनात सहभाग घेतला होता. सरकारने जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य केल्या असून, उर्वरित मागण्यांसाठी वेळ मागितला आहे. मराठा समाजाची प्रमुख मागणी असलेल्या 'हैदराबाद गॅझेट' लागू करण्याचा जीआर सरकारने काढला आहे. यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी राजधानी दिल्लीत मराठा समाजाचे अधिवेशन घेण्याची मोठी घोषणा केली आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असतानाच, ओबीसी समाजाने मात्र आक्रमक पवित्रा घेतला आहे. या जीआरला विरोध करत, ओबीसी समाजाला त्यांच्या कोट्यातून आरक्षण नको अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. दुसरीकडे, याच गॅझेटचा आधार घेत बंजारा समाज आणि आदिवासी समाजामध्येही संघर्ष सुरू झाला आहे. बंजारा समाजाची एसटी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी आहे, ज्यामुळे आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यात विविध समाजगटांमध्ये तणाव वाढत आहे.

# बुलढाणा जिल्हा परिषदेतील 'त्या' दोन कर्मचाऱ्यांची बदली होणार

## सामान्य प्रशासन विभागात हालचालींना वेग

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**बुलढाणा :** बुलढाणा जिल्हा परिषदेतील एका विशिष्ट विभागात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या दोन कर्मचाऱ्यांवर अखेर कारवाईची टांगती तलवार आली आहे. वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांमुळे ही कार्यवाही होण्याची शक्यता आहे. या दोन्ही कर्मचाऱ्यांची, ज्यांना 'कलेक्टर' म्हणून संबोधले जाते, बदली होणार असून, त्यासाठी सामान्य प्रशासन विभागात हालचालींना वेग आला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या अंतिम मोहरेने यावर शिक्कामोर्तब होईल. ही कारवाई स्वागतार्ह असली तरी, फक्त 'कलेक्टर'वरच नव्हे तर त्यांच्या 'म्होरक्या'वरही कारवाई झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मंत्रालयीन सूत्रांनुसार, त्या अधिकाऱ्यावरही कारवाई होण्याची शक्यता आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी 'त्या' अधिकाऱ्याला झापले दरम्यान, १६ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा परिषदेच्या पदभरतीसंदर्भात एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीला सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते. याच बैठकीत, सध्या चर्चेत असलेल्या एका अधिकाऱ्याला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी चांगलेच झापले. वृत्तपत्रांमधील बातम्यांचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांची कानउघाडणी केली. यावर संबंधित अधिकाऱ्याने 'माझा व्यक्तिगत विषय आहे' असे सांगितले. मात्र, जिल्हाधिकारी पाटील यांनी, "आपण जबाबदार पदावर आहात, कसला व्यक्तिगत विषय?" असे म्हणत त्या अधिकाऱ्याला कडक शब्दांत फटकारले.

# लोढा ग्रुपचे माजी संचालक राजेंद्र लोढा यांना अटक

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**मुंबई :** पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाने बांधकाम क्षेत्रातील प्रसिद्ध लोढा ग्रुपचे माजी संचालक राजेंद्र लोढा यांना फसवणुकीच्या आरोपाखाली अटक केली आहे. या अटकेमुळे बांधकाम आणि उद्योग क्षेत्रात खळबळ उडाली आहे. अटकेपूर्वीच राजेंद्र लोढा यांनी लोढा ग्रुपच्या संचालक पदाचा राजीनामा दिला होता.

मुंबई पोलिसांनी लोढा ग्रुपचे माजी संचालक राजेंद्र लोढा यांना वरळी परिसरातून अटक केली असून, कोर्टाने त्यांना 23 सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. राजेंद्र लोढा यांच्यावर लोढा ग्रुपची 85 कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी दाखल केलेल्या एफआयआरनुसार, राजेंद्र लोढा यांनी लोढा ग्रुपचे सध्याचे संचालक आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे पुत्र अभिषेक लोढा यांना जीवे मारण्याची धमकी देखील दिली आहे. या गंभीर आरोपांमुळे या प्रकरणाने आणखी वेगळे वळण घेतले आहे

# नवरात्र यंदा ९ ऐवजी १० रात्रींची प्रतीक्षा केवळ, चार दिवसांची

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ इमरान सैय्यद**



**मालेगांव :** नवरात्रोत्सव अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला असून, शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांनी घटस्थापनेच्या तयारीला सुरुवात केली आहे. मंडप उभारणी, सजावट, धार्मिक विधींची आखणी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या तयारीला वेग आला भाविकांमध्ये उत्सुकता आणि आनंदाची लाट उसळली आहे. आहे.

दरम्यान, मूर्तिकार देवीच्या मूर्तीवर शेवटचा हात फिरवण्यात व्यस्त असून, विविध मंडळांच्या ऑर्डरनुसार मूर्ती पूर्ण करण्यात ते गुंतले आहेत. आकर्षक व देखण्या मूर्तींच्या सजावटीमुळे यंदाचा उत्सव अधिक देखणा होणार आहे. यंदा नवरात्र ९ नव्हे तर १० रात्रींचा असल्याने हा दुर्मिळ योग विशेष मानला जात आहे. पंचांगानुसार तृतीया तिथी दोन दिवस आल्यामुळे उत्सवाची मुदत एका दिवसाने वाढली आहे. त्यामुळे भक्तांना माता दुर्गेची अधिक दिवस पूजा, जप आणि दर्शन करण्याची संधी मिळणार आहे. तरुणाईसाठीही यंदाचे नवरात्र खास ठरणार आहे, कारण सलग १० दिवस गरबा आणि दांडियाचा जल्लोष अनुभवता येणार आहे. शहरातील विविध मंडळांकडून भव्य दांडिया रात्री, आकर्षक सजावट आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, युवक-युवतींमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे.



# कुणबी प्रमाणपत्राच्या वाटपास सुरुवात

## मंत्री छगन भुजबळांचा आक्षेप, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले स्पष्टीकरण

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे** : राज्य सरकारने आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या निमित्ताने मराठवाड्यातील काही जिल्ह्यांतील मराठा उमेदवारांना कुणबी प्रमाणपत्राचे वाटप केले. पण आता मंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी या प्रमाणपत्रांवर शंका व्यक्त केली आहे. आज देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्र योग्य आहेत का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, पहिली गोष्ट अशी आहे की आम्ही जे जीआर काढले आहेत त्या जीआर प्रमाणे जे पात्र आहेत त्यांना दाखले मिळतील. यातील किती लोकांना कुणबी प्रमाणपत्राचे दाखले मिळाले याची आकडेवारी माझ्याकडे नाही. पण कुठूनही मिळत नाही अशी तक्रार आलेली नाही. त्यामुळे त्याची जे काही योग्य कागदपत्रांची पूर्तता आहे ती पूर्तता, त्यानंतर ज्या दोन समित्या तयार केल्या आहेत त्यांचा अहवाल याच्या आधारावर मिळेल. मंत्री छगन भुजबळ यांनी कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला आहे. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, भुजबळ साहेब यांनी जे म्हटले आहे त्या संदर्भात या पूर्वीच मी स्पष्ट केले आहे खाडाखोड चालणार नाही. ज्यांच्याकडे दाखले आहेत त्यांच्याच नातेवाईकांना दाखले मिळतील, आपला कायदा आहे. जर कोणाला एखाद्याला मिळालेल्या दाखल्यावर आक्षेप असेल तर तो आक्षेप घेऊ शकतो. त्यामुळे भुजबळ साहेबांच्या जर कुठे नजरेस आले असेल तर निश्चितपणे दखल घेऊन त्यासंदर्भात तक्रार दाखल केली तर त्यावर उचित कारवाई केली जाईल. मुंबई येथे मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग टाकण्यात आला होता. त्यानंतर शिवसेना आक्रमक झाली आहे. यावर प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची घटना ही निषेधार्य आहे. ज्या कुठल्या समाजकंटकाने ही घटना केली आहे त्याला पोलिस शोधून काढतील आणि कारवाई करतील. यापेक्षा जास्त याला राजकीय रंग देणे हे मला योग्य वाटत नाही. सध्या आलमाटी धरणाच्या उंचीवरून वाद सुरू आहेत. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राचा आलमाटीची ऊंची वाढवण्यासाठी विरोध आहे. या संदर्भात आवश्यकता पडली तर महाराष्ट्र सर्वोच्च न्यायालयात जाईल आणि कर्नाटक राज्याच्या विरोधात पीटिशन करेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने महसूल विभागाच्या वतीने सेवा पंधरवड्याच्या अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबवण्यात येत आहे. यात वेगवेगळ्या प्रकारच्या 10 महत्त्वाच्या योजना राबवण्यात येत आहेत. पाणंद रस्त्यांचे मॅपिंग असेल किंवा लोक अदालतीच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे असेल, जे वाद आहेत ते वाद संपवण्याच्या गोष्टी या माध्यमातून करण्यात येणार आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी कुणबी प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला आहे. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, भुजबळ साहेब यांनी जे म्हटले आहे त्या संदर्भात या पूर्वीच मी स्पष्ट केले आहे खाडाखोड चालणार नाही. ज्यांच्याकडे दाखले आहेत त्यांच्याच नातेवाईकांना दाखले मिळतील, आपला कायदा आहे. जर कोणाला एखाद्याला मिळालेल्या दाखल्यावर आक्षेप असेल तर तो आक्षेप घेऊ शकतो. त्यामुळे भुजबळ साहेबांच्या जर कुठे नजरेस आले असेल तर निश्चितपणे दखल घेऊन त्यासंदर्भात तक्रार दाखल केली तर त्यावर उचित कारवाई केली जाईल.मुंबई येथे मीनाताई ठाकरे यांच्या पुतळ्यावर रंग टाकण्यात आला होता. त्यानंतर शिवसेना आक्रमक झाली आहे. यावर प्रश्न विचारण्यात आला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, अशा प्रकारची घटना ही निषेधार्य आहे. ज्या कुठल्या समाजकंटकाने ही घटना केली आहे त्याला पोलिस शोधून काढतील आणि कारवाई करतील. यापेक्षा जास्त याला राजकीय रंग देणे हे मला योग्य वाटत नाही.

**CAPTION** कॅमेरा लेन्स....



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तसेच ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नवीन अग्निशामक गाडीचे उद्घाटन.... यावेळी उपनेते निलेश सांबरे, मारुती धिर्डे,विजय भगत,हारेश पष्टे सह शहापूर नगरपंचायतचे नगरसेवक उपस्थित होते.

## 'निरोगी महिला, सक्षम कुटुंब' अभियानाचा शुभारंभ: आयुषमंत्री प्रतापराव जाधव व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती

बातमी जगत | प्रतिनिधी

**बुलढाणा** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू झालेल्या 'निरोगी महिला, सक्षम कुटुंब' या अभियानांतर्गत मुंबई येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेतला आणि देशाच्या आरोग्य धोरणांवर महत्त्वपूर्ण भाष्य केले. पंतप्रधानांनी आयुर्वेदाला जागतिक स्तरावर नेले: आयुषमंत्री प्रतापराव जाधव केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी आपल्या भाषणात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निरोगी भारताचे स्वप्न पाहिल्याचे सांगितले. हे स्वप्न साकार करण्यासाठी पारंपारिक भारतीय



चिकित्सा पद्धती, विशेषतः आयुर्वेद, विकसित करण्याकरिता स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. यामुळे आयुर्वेदाचे महत्त्व जगभरात पोहोचले, असे ते म्हणाले. जाधव यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे आणि दुर्लक्षित राहिलेल्या युनानीसारख्या पारंपारिक उपचार पद्धतींनाही योग्य महत्त्व दिले जात आहे. महाराष्ट्रात लवकरच नवीन आयसीएमआर संशोधन केंद्र सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. 'निरोगी महिला, सक्षम कुटुंब' या अभियानांतर्गत जास्तीत जास्त महिलांची आरोग्य तपासणी करून घ्यावी आणि या अभियानात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यात 75 हजार शिबिरे घेणार: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान मोदींच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. गेल्या ११ वर्षांत त्यांनी देशातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेल्या कार्याचा त्यांनी गौरव केला. कोविड-१९ साथीच्या काळात भारतासाठीच नव्हे, तर अनेक देशांसाठी लस उपलब्ध करून देण्यासाठी पंतप्रधानांनी घेतलेल्या अथक प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली. 'निरोगी महिला, सक्षम कुटुंब' या अभियानाबद्दल बोलताना शिंदे म्हणाले की, महिलांच्या आरोग्याचे लवकर निदान होणे महत्त्वाचे आहे. कुटुंबाचे व्यवस्थापन करणाऱ्या महिलांचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरेल. या अभियानांतर्गत राज्यभरात ७५ हजार शिबिरे आयोजित केली जाणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. यावेळी केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच, मोठ्या संख्येने महिला आणि पुरुष सहभागी झाले होते.

## घटना -घडामोडी



### बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन येथे शिक्षक दिन उत्साहात

बातमी जगत | प्रतिनिधी

स्थानिक बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन व माध्यमिक विद्यालय मालेगाव येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच 5 सप्टेंबर शिक्षक दिनचे औचित्य साधून साजरा करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन ,महात्मा ज्योतिबा फुले आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली कार्यक्रमाचे प्रारंभी इयत्ता आठवीच्या मुलींनी सुंदर असे गुरुजीवन वर आधारित गीत सादर करून वातावरण अतिशय प्रफुल्लित करण्याचे काम केले कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे शब्दसुमनाने व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक वृंदांचा छोटीशी भेटवस्तू देऊन व सुंदर असे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला तर इयत्ता आठवीतील रुपेश कुटे या विद्यार्थ्याने डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांचा जीवनपट आणि त्यांची कारकीर्द या विषयी माहिती देऊन सुंदर अशी प्रास्ताविक सादर केले व कार्यक्रमाला योग्य असे स्वरूप निर्माण करून दिले कार्यक्रमादरम्यान वरद लठाड या विद्यार्थ्याने इंग्रजीतून आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेल्या श्री स्वामी समर्थ बालसंस्कार विद्या मंदिर च्या मुख्याध्यापिका आदरणीय सौ जैन मॅडम यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाबद्दल प्राचीन कळी असलेली विचारसरणी आणि आजची विचारसरणी आपण आत्मसात केली पाहिजे व आपण सुद्धा आपल्या गुरुजनांपासून आदर्श घेऊन अतिशय उंच भरारी घेतली पाहिजे असे मत व्यक्त केले कार्यक्रमाच्या शेवटी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक जीवनावर आधारित अतिशय सुंदर आणि सर्वांचे मन प्रसन्न करणारे छोटेसे असे नृत्य सादर केले व त्यातून संपूर्ण वातावरण प्रफुल्लित केले कार्यक्रमाची संपूर्ण रूपरेषा आखणी ही इयत्ता आठवीच्या वर्गशिक्षिका आदरणीय कु. शितल रोठे मॅम तर कार्यक्रमाचे नियोजन श्री भालेराव सर यांनी केले कार्यक्रमाचे संचालन इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी कुमारी रोहिणी बनसोड कुमारी गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री कावरखे सर यांनी केले कार्यक्रमाचे शेवटी चॉकलेट वाटप करण्यात आले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी कठीण असे परिश्रम घेतले.

## आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते शेरे गावात व्यायामशाळा व सभामंडपाचे लोकार्पण

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ वसंत पानसरे

**ठाणे** : शहापूर तालुक्यातील शेरे ग्रामपंचायत मधील शेरे गावात उपसरपंच योगेश तारमळे यांच्या विशेष प्रयत्नांनी बांधण्यात आलेल्या व्यायामशाळा व सभागृहाचे लोकार्पण सोहळा मुरबाड विधानसभा आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी संपन्न झाला सोहळा.

गावातील युवकांना खेळ शरीर संपत्ती आरोग्य जोपासणे व सांस्कृतिक सामाजिक एकोपा उपक्रमांसाठी योग्य मंच मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे उच्च शिक्षित उपसरपंच योगेश भगवान तारमळे यांनी ठाम नेतृत्व करताना तरुणांचे स्वप्न साकार करून दाखवले. यावेळी सरपंच गुरुनाथ नवसु



पारधी, उपसरपंच सुरेश डोंगरे यांचा ह्या कामात मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रम प्रसंगी आमदार कथोरे यांनी सर्व ग्रामस्थांना आ लवकरच विशेष निधी मधून शेरे गावची पाणी समस्या सोडवणार तसेच गाव तलाव सुशोभीकरण करण्याचे आश्वसीत केले. याप्रसंगी आदिवासी आघाडी चे उपाध्यक्ष अशोक इरणक, रवींद्र घोडविंदे सर(कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती अध्यक्ष), ह भ प कैलास महाराज निचिते(संस्थापक वारकरी तत्वज्ञान विद्यापीठ), ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष रविंद्र चंदे, हरीश निचिते(भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष),हरेश पष्टे(नगरसेवक शहापूर), काळूराम तारमले, वसंत पानसरे (तालुका अध्यक्ष प्रहार) अदी मान्यवरासह सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व शेरे ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, ग्रामस्थ व युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते .


## पुढील 24 तासांत मुसळधार पावसाचा इशारा

बातमी जगत | प्रतिनिधी

**मुंबई** : राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला असून, गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. याचा सर्वाधिक फटका मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला बसला आहे. मराठवाड्यात पावसाच्या तडाख्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक हिरावले गेले आहे.

या मुसळधार पावसामुळे नद्या-नाल्यांना पूर येऊन अनेक जनावरे दगावली आहेत. शेतातील पिके वाहून गेली असून, अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उद्याही (दिनांक 18 सप्टेंबर) अनेक भागांमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आल्यामुळे पावसाचा धोका अद्यापही कायम आहे. भारतीय हवामान विभागाने 18 सप्टेंबर रोजी महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. या अंदाजानुसार, उद्या राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस पडेल आणि ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यावर दुहेरी संकट येण्याची शक्यता असून, नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वीजांच्या कडकडटासह तसेच मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## कविता



### दुर्गा शक्ति

आदि शक्ति दुर्गा!भक्ती रूप आई!
शक्ति दाता ताई! माता दुर्गा!!1!!

ज्ञान ऊर्जा माया! संस्कृती रक्षाया!
तिच देते छाया! सांभाळून!!2!!

विविध अंगात! गाजते भासते!
सुंदर दिसते! रुपवती!!3!!

पापीचा संहार! घाली तलवार!
मानेवर वार! छाटण्यास!!4!!

अंनत स्वरूप! दाखवी हुरूप!
घेत सारं रूप! भक्ता साठी!!5!!

विविध अंगात! नवीन रंगात!
तल्लीन गाण्यात!भक्त गण!!6!!

सोहळा भारीच! करतात सारी!
तिच्या दरबारी! नवरात्री!!7!!

गुणांचीं ती खाण! देवा अभिमान!
केलंय निर्माण! आदिशक्ती!!8!!

किती वर्णु सांगा! अभंगी प्रदीप!
लावी ज्ञान दिप! सरस्वती!!9!!©®

प्रदीप पाटील
गणपूर ता. चोपडा
जिल्हा. जळगाव
मो. 9922239055

## शहापुरात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा प्रारंभ

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ वसंत पानसरे

**ठाणे** : राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाला 17 सप्टेंबरपासून सुरुवात होत असून हा अभियान कालावधी 31 डिसेंबरपर्यंत राहणार आहे. या अभियानाची ग्रामस्तरावर सुरुवात सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेऊन ग्रामस्तरीय समिती स्थापन करून करण्यात येणार आहे. या अभियानावर लक्ष केंद्रित करण्यासाठी शहापूर पंचायत समिती कडून प्रत्येकी पाच ग्रामपंचायतीसाठी एक नोडल अधिकारी नेमण्यात आला आहे. यामध्ये क्लास वन आणि क्लास टू अधिकाऱ्यांचा समावेश आहे. पत्रकारांशी संवाद साधताना शहापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बी. एच. राठोड, सहा. गट विकास अधिकारी विलास



झुंझारराव, गट शिक्षण अधिकारी रामचंद्र विशे, बाल विकास प्रकल्प अधिकारी धनश्री साळुंखे, विस्तार अधिकारी नरेश पाटील, विलास जाधव, बाळकृष्ण वाघचौरे, प्रशासन अधिकारी अजय भोंडिवले व कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रकाश म्हाळुंगे आदी उपस्थित होते.अभियानाचे मुख्य घटक म्हणून सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, तसेच लोकसहभागातून लोकचळवळ निर्माण करणे यांचा समावेश आहे.या अभियानात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या कामगिरीचे मूल्यमापन होणार असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना एकूण १९०२ पुरस्कार वितरित करण्यात येणार आहेत. यासाठी शासनाने २०५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.अभियानाची जनजागृती करण्यासाठी ग्रामीण पत्रकारांना व डिजिटल माध्यमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एका ग्रामीण पत्रकारास राज्यस्तरीय पुरस्कार तर इन्स्टाग्राम, फेसबुक व युट्युबवर या अभियानाला व्यापक प्रसिद्धी देणाऱ्या तीन चॅनेल्स/अकाउंट्सना देखील राज्यस्तरीय पुरस्कार दिले जाणार आहेत.

बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना - घडामोडी



### जिल्हाधिकारी कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** जिल्हाधिकारी कार्यालयात प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी निवासी जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांच्या हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसीलदार विजय सवडे, वृषाली केसकर, जिल्हा नाझर गजानन मोतेकर इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### आम्हाला बदनाम करू नका:तमाशा कलावंत मंगला बनसोडे स्पष्टच बोलल्या

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**सोलापूर :** जिल्ह्यातील वैराग येथे एका विवाहित तरुणाने, बीड जिल्ह्यातील गेवराईचा माजी उपसरपंच असलेल्या गोविंद बर्गेने, एका नर्तिकेच्या नादात आत्महत्या केली. या घटनेमुळे सोलापूर आणि बीड जिल्ह्यात खळबळ उडाली होती. गोविंदच्या मृत्यूने त्याचे कुटुंब पोरके झाले, ज्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त झाली. या घटनेनंतर नर्तिका पूजा गायकवाड हिला नेटकरी आणि गोविंदच्या गावकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात टीकेला सामोरे जावे लागले. गोविंदच्या मेहुण्याने दिलेल्या तक्रारीनंतर पूजा गायकवाडला अटकही करण्यात आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे राज्यातील गावांमध्ये चालणाऱ्या 'कला केंद्रांचा' मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या कला केंद्रांमधून चालणारा वेश्याव्यवसाय आणि इतर अवैध धंदे उघडकीस आल्याने, 'तमाशा' या पारंपारिक लोककलेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर, तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांनी 'आम्हाला बदनाम करू नका' असे आवाहन करत, तमाशा आणि कला केंद्रांमधील फरक स्पष्ट केला आहे. मंगला बनसोडे म्हणाल्या, सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्रात चार भिंतीमध्ये कार्यक्रम असतो तर लोकनाट्य तमाशामध्ये शंभर कलावंत असतात आणि ते त्यांची कला हजारो रसिकांसमोर सादर करतात. वयाच्या 7 व्या वर्षापासून ते आजपर्यंत हजारो रसिकांसमोर मी कला सादर केली. त्यावेळी रसिकांनी देखील आम्हाला न्याय दिला, आमच्यावर प्रेम केले. त्यामुळेच मला आणि माझ्या आईला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला, असे परखड मत बनसोडे यांनी मांडले आहे. पुढे बोलताना मंगला बनसोडे म्हणाल्या, कला केंद्र आणि तमाशा हे वेगळे आहेत, कला केंद्रामुळे आमचा तमाशा बदनामी करू नये. तमाशा आणि कला केंद्र यामध्ये जमीन-आसमानाचा फरक आहे. तमाशामध्ये लोककला, समाज प्रबोधन हे कलाकार हजारो प्रेक्षकांसमोर दाखवत असतात. त्यामुळेच, शासनासह रसिकांनी देखील लक्षात घेतलं पाहिजे कला केंद्र ही वेगळी बाजू आहे

## पान एक वरून

प्रसिद्ध हॉलिवूड अभिनेत्री सिडनी स्वीनी लवकरच एका बॉलिवूड चित्रपटात दिसू शकते. वृत्तानुसार, सिडनीला बॉलिवूड चित्रपटात काम करण्यासाठी ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त फी ऑफर करण्यात आली आहे. एका वृत्तानुसार, एका भारतीय निर्मिती कंपनीने अभिनेत्रीला ४५ दशलक्ष पौंड म्हणजेच ५३० कोटी रुपयांची मोठी डील ऑफर केली आहे. द सनने दिलेल्या वृत्तानुसार यामध्ये ₹४१५ कोटी (४.१५ अब्ज रुपये) शुल्क आणि ₹११५ कोटी (१.१५ अब्ज रुपये) चा प्रायोजकत्व करार समाविष्ट आहे. या मोठ्या रकमेमागील हेतू सिडनीच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा वापर करणे आहे. निर्मात्यांना आशा आहे की चित्रपटाला जागतिक व्यासपीठ देण्यासाठी तिचा वापर केला जाईल. तथापि, सिडनीने हा करार स्वीकारला आहे की नाही हे अहवालात नमूद केलेले नाही. तथापि, सिडनीच्या जवळच्या सूत्रानुसार, या कराराच्या आकारामुळे अभिनेत्रीला स्वतःला धक्का बसला होता. अहवालांनुसार हा चित्रपट आतापर्यंतचा सर्वात महागडा भारतीय चित्रपट असेल. या चित्रपटात सिडनी एका तरुण अमेरिकन स्टारची भूमिका साकारणार आहे जी एका भारतीय सेलिब्रिटीच्या प्रेमात पडते. पुढील वर्षी लंडन, दुबई, न्यू यॉर्क आणि पॅरिसमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण केले जाईल. तथापि, चित्रपटाच्या शीर्षकाबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

# नवरात्रोत्सवासाठी पेणमध्ये नवदुर्गांच्या मूर्ती सज्ज; मूर्तिकारांचे काम अंतिम टप्प्यात







**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ किरण बांधनकर**

**पेण :** अश्विन शुद्ध प्रतिपदा म्हणजेच घटस्थापनेला २२ सप्टेंबरपासून नवरात्रोत्सवाचा प्रारंभ होत आहे. यासाठी पेणमधील गणेशमूर्ती कार्यशाळांमध्ये नवदुर्गांच्या मूर्ती तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. मूर्तिकार मूर्तींना रंग देऊन तसेच वस्त्र आणि अलंकारांनी सजवून घेतलेल्या ऑर्डर पूर्ण करण्यात व्यस्त आहेत. विविध रूपांतील मूर्तींना मागणी यावर्षी सार्वजनिक मंडळांकडून मोठ्या मूर्तींना जास्त मागणी आहे. आठ, दहा आणि बारा फूट उंचीच्या नवदुर्गांच्या मूर्तींची विशेष मागणी असून, सिंहावर, वाघावर, हत्तीवर आणि राजसिंहासनावर आरूढ झालेल्या देवीच्या मूर्ती लक्ष वेधून घेत आहेत. यासोबतच महिषासुरमर्दिनी, चंडिका, अंबिका, एकविरा, कोल्हापूरची अंबाबाई, तुळजाभवानी, रेणुका आणि सप्तशृंगी भवानी यांसारख्या देवींच्या पारंपरिक रूपांतील मूर्तींनाही मोठी पसंती मिळत आहे. ऑर्डरची पूर्तता करण्यासाठी लगबग पेणमधील मूर्तिकार सार्वजनिक मंडळांसाठी ५०० मोठ्या मूर्ती आणि घरगुती पूजेसाठी दोन हजार लहान मूर्ती तयार करत आहेत. दिपक कला केंद्राचे मूर्तिकार सचिन समेळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा मूर्तींच्या 'अॅडव्हान्स बुकिंग'मध्ये वाढ झाली आहे. आतापर्यंत मुंबई, सातारा, कर्जत आणि पेण तालुक्यात सुमारे ५०० देवींच्या मूर्ती पोहोचल्या आहेत. गणेशोत्सवानंतर लगेचच नवरात्रोत्सवासाठी मूर्ती बनवण्याची लगबग सुरू झाल्यामुळे मूर्तिकार कामात व्यस्त आहेत.

## मुंबईत व्यावसायिकाची आत्महत्या

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** येथील वांद्रे-वरळी सी-लिंकवर मंगळवारी मध्यरात्री एका व्यावसायिकाने टॅक्सी थांबवून समुद्रात उडी मारली. अमित शांतीलाल चोप्रा (वय 47) असे या व्यक्तीचे नाव असून, त्यांचा इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय होता. 'साप चावला' असा आरडाओरडा करून त्यांनी टॅक्सी थांबवली आणि समुद्रात उडी घेतली. व्यावसायिक कारणांमुळे असलेल्या तणावातून त्यांनी आत्महत्या केली असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले. मात्र, त्यांना कोणतीही चिठ्ठी सापडली नाही. त्यामुळे आत्महत्येचे नेमके कारण जाणून घेण्यासाठी पोलिसांकडून त्यांच्या कुटुंबीयांची चौकशी केली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. अमित चोप्रा मूळचे राजस्थानचे असून त्यांचे सर्व नातेवाईक तिथेच राहतात. मात्र, चोप्रा हे पत्नी आणि मुलांसोबत मुंबईतील अंधेरी पश्चिम येथे राहत होते आणि मुंबईतच त्यांचा इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय होता. मंगळवारी मध्यरात्री 1 वाजण्याच्या सुमारास त्यांनी एक टॅक्सी पकडली. टॅक्सी वांद्रेमार्गे सी-लिंकवर आल्यावर त्यांनी अचानक 'आपल्याला साप चावला' असा आरडाओरडा सुरू केला. त्यामुळे घाबरलेल्या टॅक्सीचालकाने गाडी बाजूला थांबवली. याच संधीचा फायदा घेत चोप्रा यांनी टॅक्सीचा दरवाजा उघडला आणि थेट सी-लिंकवरून समुद्रात उडी मारली. टॅक्सीचालकाने तात्काळ सी-लिंक कर्मचारी आणि पोलिसांना या घटनेची माहिती दिली. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून चोप्रा यांचा मृतदेह समुद्रातून बाहेर काढला.

## अवैध वाळू उपसा तात्काळ थांबवा! - चंद्रकांत खरात यांची महसूल मंत्र्यांकडे मागणी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ राजेश पंडित**



**देऊळगाव राजा :** बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजासह राज्यभरात नदी पात्रातून होणाऱ्या अवैध वाळू उपशामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. या गंभीर समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना १५ सप्टेंबर २०२५ रोजी निवेदन पाठवले आहे. पर्यावरणाचे नुकसान आणि गुन्हेगारी वाढीची भीती निवेदनात खरात यांनी म्हटले आहे की, अवैध वाळू उपशामुळे नद्यांचे पात्र बदलत असून जलस्त्रोत नष्ट होत आहेत. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या शेतीवर होत आहे. यामुळे गावांमध्ये अशांतता निर्माण होऊन गुन्हेगारी वाढण्याची शक्यता आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी शासन आणि प्रशासनाने कठोर पावले उचलणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रशासनाकडे केल्या ठोस मागण्या चंद्रकांत खरात यांनी प्रशासनासाठी काही ठोस मागण्या केल्या आहेत: लोकआयुक्तांच्या निर्देशांनुसार नदीपात्रातील वाळू उपसा तात्काळ थांबवावा. अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे.

पोलीस विभागाने गस्त वाढवून अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करावी. अवैध वाळू उपशाचे दुष्परिणाम लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जनजागृती मोहीम राबवावी. नागरिकांनाही सहकार्याचे आवाहन यासोबतच खरात यांनी नागरिकांनाही पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, "नद्यांचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अवैध वाळू उपशाला पाठिंबा न देता त्याविरोधात आवाज उठवा." समाजात शांतता आणि पर्यावरण जपण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक या सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास भविष्यातील मोठे संकट टाळता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## शेलगाव देशमुख येथे मंजूर वीजरोहित्र तात्काळ बसवा -शैलेश सावजी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**✦ विष्णु आखरे पाटील**



**मेहकर :** तालुक्यातील शेलगाव देशमुख गावात वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटींमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. येथील श्री विठ्ठल रुखमाई विद्यालयाजवळील वीजरोहित्रावर जास्त भार असल्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होतो, ज्यामुळे प्रभाग दोनमधील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. फ्यूज उडणे आणि विजेचा पुरवठा वारंवार खंडित होणे, यामुळे या वीजरोहित्राची स्थिती दयनीय झाली आहे. या समस्येची दखल घेत काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी २०२०-२०२१ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून नवीन वीजरोहित्र मंजूर करून घेतले होते. या नवीन वीजरोहित्राच्या कामामुळे सध्याच्या वीजरोहित्रावरील भार कमी होण्यास मदत होणार होती. मात्र, वीजरोहित्र मंजूर होऊनही अद्याप त्याचे काम सुरू झालेले नाही. त्यामुळे, शैलेश सावजी यांनी डोणगाव येथील विद्युत वितरण कंपनीच्या अभियंत्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी मंजूर झालेले वीजरोहित्र तात्काळ बसवून वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर होतील.

## 18 सप्टेंबरला डॉक्टरांचा एक दिवसाचा संप

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** दिनांक – 18 सप्टेंबर 2025, गुरुवार सकाळी 8 वाजेपासून 19 सप्टेंबर 2025 शुक्रवार सकाळी 8 वाजेपर्यंत इंडियन मेडिकल असोसिएशन, बुलढाणा ब्रांच डॉक्टरांचा संप पुकारला आहे . या संपामुळे रुग्णांच्या होणाऱ्या गैरसोयीबद्दल डॉक्टरांनी दिलगीर व्यक्त केली . परंतु हा संप डॉक्टरांच्या व्यावसायिक फायद्यासाठी नाही, तर आपल्या रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी आहे. राज्य शासनाने होमिओपॅथी सीसीएमपीना आधुनिक वैद्यक (ॲलोपॅथी) पद्धतीने उपचार करण्याचा परवाना दिला आहे. हा निर्णय रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण करणारा आहे. एलोपॅथीचे अल्प प्रशिक्षण घेऊन आजारांवर एलोपॅथी उपचार करण्याचा अधिकार देणे धोकादायक आहे. IMA डॉक्टर म्हणून आमचे कर्तव्य फक्त उपचार करणे नाही, तर आपल्या सर्वांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हेही आहे. म्हणूनच आम्ही 18 सप्टेंबर रोजी संप करून शासनाला जागृत करत आहोत. हा संघर्ष आपल्या जीविताच्या सुरक्षिततेसाठी आहे.हा संघर्ष भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित आरोग्यसेवा टिकवण्यासाठी आहे. जनतेनी या आंदोलनाला नैतिक पाठिंबा द्यावा, अशी विनंती. इंडियन मेडिकल असोसिएशन, बुलढाणा ब्रांच, महाराष्ट्र चे सचिव डॉ. जी. वाय. व्यवहारे यांनी केली आहे.




## दत्तपूर येथे सेवा पंधरवडा व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा उत्साहात प्रारंभ

**बातमी जगत | प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर दरम्यान आयोजित सेवा पंधरवडा आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची दत्तपूर ता.जि. बुलढाणा येथे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या उपस्थितीत उत्साहात सुरुवात झाली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वतः ग्रामसभा घेत दत्तपूर येथील गावकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण केले. दत्तपूर हे जिल्हा प्रशासनाचे दत्तक गाव असून या गावाच्या विकासामध्ये जिल्हाधिकारी यांनी व्यक्तिशः लक्ष दिले आहे. या सेवा पंधरवाड्याच्या सुरुवातीला जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत शिव, पाणंद रस्त्याचे सर्वेक्षण करण्यात आले व त्याबाबत चावडी वाचनाद्वारे गावकऱ्यांना अवगत करण्यात आले. तसेच जिवंत ७/१२ मोहिमेबाबतही गावकऱ्यांना माहिती देण्यात आली व घरकुलाच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. त्याचबरोबर दत्तपूर ग्रामपंचायतीच्या वतीने दत्तपूर जिल्हा परिषद शाळेला जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते साहित्य वितरित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनीही गावकऱ्यांना संबोधित केले व विविध शासकीय योजनांची माहिती दिली. यावेळी दत्तपूर गावचे सरपंच संदीप कांबळे, उपसरपंच जीवन दाभाडे, सदस्य आकाश माळोदे, राहीबाई रमेश जाधव, अनिता गजानन भराड, शीतल समाधान माळोदे, तसेच भागवत वानेरे, ग्रामविकास अधिकारी नितीन इंगळे,तलाठी उषा इंगळे, मंडळ अधिकारी पायघन, सहाय्यक जाधव,पोलीस पाटील श्रीकृष्ण राऊत व भास्कर माळोदे, पोलिस जमादार तायडे, मुख्यध्यापक बबन गोरे, समुदाय आरोग्य अधिकारी अंजली चित्ते, आरोग्यसेवक सचिन चिंचोले, सुनीता वैद्य, गजानन जाधव यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

घटना-घडामोडी



## महिलांनी केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्य विषयक योजनांचा लाभ घ्यावा: केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ स्वप्निल सोनवणे

**जळगाव :** महिलांनी केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्यविषयक विविध योजनांचा लाभ घेऊन आपले आरोग्य जपावे. असे आवाहन, केंद्रीय युवा कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले. केंद्र सरकारच्या 'स्वस्थ नारी' - 'सशक्त परिवार' या अभियाना निमित्त जळगाव जिल्हा रुग्णालय, येथे आयोजित कार्यक्रम प्रसंगी श्रीमती खडसे बोलत होत्या. कार्यक्रमात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रमुख उपस्थितीत मध्य प्रदेशातील धार जिल्हयात आयोजित "स्वस्थ नारी'-'सशक्त परिवार" अभियान' शुभारंभ कार्यक्रमाचे थेट प्रसारण दाखविण्यात आले. या प्रसंगी खासदार श्रीमती स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकुर आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यमंत्री श्रीमती खडसे आपल्या मनोगतात म्हणाल्या, महिलांनी आरोग्य विषयक शासकीय योजनांचा लाभ घेऊन नियमित आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी. कुटुंबातील महिला स्वस्थ असेल तर संपूर्ण कुटुंब सशक्त राहू शकते. महिलांनी आपल्या नियमित आहाराकडे लक्ष देऊन आपले आरोग्य चांगले ठेवावे, आरोग्याची काळजी घ्यावी.'सेवा पंधरवाडा' हा उपक्रम सर्व शासकीय यंत्रणांच्या सहकार्याने राबविला जात आहे या उपक्रमा निमित्त, विविध शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवून, लोकसहभाग वाढवून लोकांना लाभ मिळवून देण्यासाठी शासकीय यंत्रणांतर्फे प्रयत्न झाले पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला या परिसरात उभारण्यात आलेल्या आरोग्य विषयक योजनांची माहिती देणा-या विविध स्टॉलला राज्यमंत्री यांनी भेट दिली व माहिती जाणुन घेतली. शासनातर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान सेवा पंधरवड्यात 'स्वस्थ नारी - सशक्त परिवार' व 'नमो नेत्र संजीवनी' या सेवा अभियानांतर्गत जिल्ह्यातील सर्व शासकीय संस्थांमध्ये वैद्यकीय तपासणी व उपचार मोहिमा राबविण्यात येणार आहेत. या कालावधीत एकूण २,०९९ शिबिरे आयोजित करण्यात येणार असून महिला आरोग्य तपासणी, एनसीडी स्क्रीनिंग, क्षयरोग तपासणी, ॲनिमिया व सिकलसेल तपासणी, लसीकरण सेवा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आहारविषयक जनजागृती, संसर्गजन्य रोग नियंत्रण, रक्तदान शिबिरे तसेच आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड वितरण या सेवा नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. सेवा पंधरावाड्या निमित्त आयोजित शिबिरात स्क्रीनिंग झालेल्या रुग्णांना शस्त्रक्रिया अथवा रुग्णालयात दाखल होण्याची आवश्यकता भासल्यास, त्यांचे मोफत उपचार महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत अंगीकृत खासगी रुग्णालये किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात केले जाणार आहेत. कार्यक्रमात आयुष्मान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांचे केवायसी पूर्ण करण्यात आले. या अभियानात ऑर्किड मल्टी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, वनिता मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल व प्रकाश चिल्ड्रन्स हॉस्पिटल, जळगाव यांनी सहभाग नोंदविला. तसेच राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य आजार नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियान, राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण कार्यक्रम, राष्ट्रीय हिवताप कार्यक्रम व मुख्यमंत्री सहाय्यता निधी याबाबत जनजागृतीसाठी माहितीपर स्टॉल्स उभारण्यात आले. कार्यक्रमादरम्यान जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल यांना 'निक्षय मित्र' म्हणून गौरविण्यात आले. तसेच इतर निक्षय मित्र यांनाही सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आयुष्मान भारत योजनेचे लाभार्थी नागरिकांना गोल्डन कार्ड वाटपही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला आशा वर्कर्स अंगणवाडी सेविका, शासकीय रुग्णालय व महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आभार व्यक्त केले.

# पायवाटा व बैलगाडीवाटांना मिळणार संकेतांक

## ग्रामीण रस्ते होणार अतिक्रमणमुक्त; महसूल विभागाचा निर्णय

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ इमरान सैय्यद

**मालेगांव :** ग्रामीण भागातील रस्त्यांवरील अतिक्रमण, त्यातून होणारी वाहतुकीची कोंडी आणि विकासकामांमध्ये निर्माण होणारा अडथळा या गंभीर समस्येवर राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. आता राज्यातील प्रत्येक ग्रामीण रस्त्याला विशिष्ट संकेतांक (कोड क्रमांक) देण्यात येणार असून, त्या रस्त्यांचे आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सीमांकन केले जाणार आहे.

महसूल विभागाच्या माध्यमातून हा निर्णय राबविण्यात येणार आहे. हा निर्णय प्रभावी असला तरी प्रत्यक्षात त्यक्षात अंमलबजावणी करताना ग्रामपातळीवरील राजकीय दबाव, स्थानिक वाद, तसेच अतिक्रमणकर्त्यांचा विरोध ही आव्हाने उभी राहण्याची शक्यता आहे. यासाठी सीमांकनानंतर योग्य ती कारवाई करण्यासाठी प्रशासनाला ठाम पावले उचलावी लागणार आहेत. ही प्रक्रिया राबबवताना गावातील महसूल नकाशे,



ग्रामपंचायत नोंदी तसेच पोलिस पाटील यांच्या मदतीने सर्व रस्त्यांची यादी तयार केली जाईल. ही यादी ग्रामसभेत सादर करून तहसीलदारांकडे पाठवली जाईल. पुढे जिल्हाधिकाऱ्यांकडे ही माहिती सुपूर्द केली जाणार असून, पोलिस व महसूल विभाग अतिक्रमण हटविण्याच्या कामात समन्वय साधणार आहेत. सीमांकन शिवार नकाशावर स्पष्टपणे दाखवले जाईल, ज्यामुळे भविष्यातील कोणत्याही वादात ठोस पुरावा असेल. प्रत्येक रस्त्याला स्वतंत्र क्रमांक मिळाल्यामुळे देखभाल, दुरुस्ती नवी डांबरीकरण यासारखी कामे सोपी होतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे ग्रामीण रस्त्यांची नोंद व देखभाल अधिक शिस्तबद्ध होणार असून, याचा थेट लाभ गावागावातील शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना होईल.



"गावागावचे रस्ते अचूक कामात त्यांना नंबर दिला जाणार आहे. या उपक्रमामुळे रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यास मदत होईल व पुन्हा अतिक्रमण होणार नाही. रस्त्यांची नोंद झाल्याने त्यांची व्यवस्थित देखभाल होणार आहे. ग्रामीण भागातील वाहतुकीची गुणवत्ता सुधारण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याने गावकऱ्यांना चालणं, शेतमाल वाहतूक, विद्यार्थ्यांना शाळेत जाणे सुकर होणार आहे.

**- रंजना गोरे, प्र तहसीलदार, मालेगांव**

### समित्यांची देखरेख

तालुका आणि जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात येतील. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि संबंधित विभागीय अधिकारी या समित्यांवर देखरेख ठेवणार आहेत. यामुळे अतिक्रमणमुक्त रस्ते ही मोहीम प्रभावीपणे राबवली जाईल.

### अपेक्षित परिणाम

ग्रामीण भागातील वाहतूक कोंडी कमी होईल. शेतकरी व ग्रामस्थांना त्यांच्या पिकांची बाजारपेठेत ने-आण सोपी होईल. रस्त्यांच्या दुरुस्ती व विकासकामांत पारदर्शकता वाढेल. अतिक्रमणावर आळा बसल्याने गावोगावी वाढत असलेली कायदेशीर वादाची प्रकरणे कमी होतील. नागरिकांना सुरक्षित आणि मोकळा रस्ता मिळेल.

## सिं.राजा मतदार संघात ढगफुटीमुळे शेकडो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान; तात्काळ मदतीची मागणी

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ राजेश पंडित

**देऊळगाव राजा :** गेल्या काही दिवसांपासून सिंदखेडराजा मतदार संघात अतिवृष्टीने थैमान घातले असून, १५ आणि १६ सप्टेंबर रोजी झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. आमना नदीला आलेल्या पुरामुळे सावखेड तेजन, सिंदखेड राजा, किनगाव राजा, देऊळगाव राजा, देऊळगाव मही, मेरा, साखरखेर्डा आणि शेळगाव आटोळ या भागांतील शेकडो शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेली आहेत. यामुळे शेतजमिनींचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, अनेक शेतकरी संकटात सापडले आहेत. डॉ. शशिकांत खेडेकर यांची



उपमुख्यमंत्र्यांकडे धडक

या गंभीर परिस्थितीची दखल घेत माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांनी तातडीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यांनी शेतकऱ्यांचे हाल आणि झालेले प्रचंड नुकसान उपमुख्यमंत्र्यांसमोर मांडले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांसाठी सरसकट नुकसान भरपाई देण्याची आणि तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या भेटीदरम्यान केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपमुख्यमंत्र्यांनी दिली गंभीर दखल; तात्काळ सर्वेक्षणाचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या परिस्थितीची गंभीर दखल घेत तात्काळ बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांना सर्वेक्षण करून नुकसानाचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यानंतर योग्य ती नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय घेतला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून त्यांना आवश्यक ती सर्व मदत दिली जाईल, असेही ते म्हणाले. यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. मात्र, प्रत्यक्ष मदत जलदगतीने मिळावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. सध्या जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण सुरू केले आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर राज्य सरकार आर्थिक मदतीसह बियाणे आणि शेती उपकरणांची उपलब्धता वाढवण्यासाठी निर्णय घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## रोहना गावच्या तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी सतीश डोके यांची बिनविरोध निवड

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ रंजीत खिल्लारे

**दे.मही :** गावातील वाद-विवाद गावातच शांततापूर्ण मार्गाने मिटावेत या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'महात्मा गांधी तंटामुक्त अभियाना'अंतर्गत, देऊळगाव राजा तालुक्यातील रोहना गावात तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी सतीश डोके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ज्या शांततेच्या उद्देशाने ही समिती स्थापन झाली, त्याच समितीच्या अध्यक्षपदासाठी काही ठिकाणी वाद होत असताना, रोहना गावाने मात्र एकमताने निर्णय घेऊन एक आदर्श



निर्माण केला आहे. सामाजिक कार्यकर्ते सतीश डोके यांनी एकमेव अर्ज दाखल केल्याने, त्यांची ही निवड बिनविरोध झाली. यावेळी सरपंच लक्ष्मण डोके, उपसरपंच गणेश डोके, ग्रामसेवक जाधव मॅडम आणि गावातील अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सतीश डोके यांच्या निवडीमुळे गावातील वाद-विवाद शांततेने मिटतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## चतुर्थ श्रेणी दर्जासाठी महसूल सेवकांचा एल्गार; नागपूरमध्ये आंदोलन तीव्र

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ किरण बांधणकर

**पेण :** आपल्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेने आंदोलन तीव्र केले आहे. पूर्वाश्रमीचे कोतवाल म्हणजेच आताचे महसूल सेवक यांना शासनाने अजूनही चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा दिलेला नाही. हा दर्जा मिळवण्यासाठी विदर्भ महसूल सेवक संघटनेच्या नेतृत्वाखाली ११ सप्टेंबर २०२५ पासून नागपूर येथे बेमुदत काम बंद आंदोलन आणि साखळी उपोषण सुरू आहे. मात्र, अद्याप शासनाकडून या मागण्यांबाबत कोणतेही ठोस उत्तर मिळालेले नाही. विविध मागण्यांसाठी आंदोलन महसूल विभागाचा कणा म्हणून ओळखला जाणारा महसूल सेवक अत्यंत उपेक्षित आहे. शासनाच्या अनेक योजना व निर्णय असूनही



त्याचा लाभ त्यांना मिळत नाही. सर्व प्रकारच्या निवडणुका, राजशिष्टाचार, पीक पाहणी, पीक विमा नोंदणी, मतदान नोंदणी, वाळू पथक, शासकीय कार्यक्रम, शेतसारा वसुली, कार्यालयीन कामे अशा अनेक जबाबदाऱ्या हे कर्मचारी नियमित कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने पार पाडतात, तरीही त्यांना योग्य वेतनश्रेणी मिळत नाही. या आंदोलनात महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेसह कोकण विभागीय अध्यक्ष सुमित कांबळे, जिल्हाध्यक्ष सचिन घरत, पेण तालुका अध्यक्ष किरण पवार, उपाध्यक्ष अनिल गोरे, सचिव संतोष पाटील, कार्याध्यक्ष अनुसया पवार, सहसचिव अशोक ठाकूर, खजिनदार प्रवीण जाधव यांच्यासह अनेक कर्मचारी सहभागी झाले आहेत. पेण तालुका अध्यक्ष किरण पवार यांनी सांगितले की, शासकीय चतुर्थ श्रेणीचा दर्जा मिळेपर्यंत हे आंदोलन आणि साखळी उपोषण सुरूच राहील.

## एकनाथ खडसेंच्या जावयाच्या अडचणीत वाढ: एसआयटी गठीत करण्याचे निर्देश

बातमी जगत | प्रतिनिधी

**पुणे :** पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. पुण्यातील रेव्ह पार्टी प्रकरणी शेकडो महिलांना फसवून त्यांचे अश्लील व्हिडीओ शूट करण्यात आल्याचा आल्याचा आरोप आहे. या गंभीर प्रकरणाच्या सखोल तपासासाठी राज्य महिला आयोगाने विशेष तपास पथक (एसआयटी) गठीत करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी महिती दिली आहे की, खेवलकरांच्या रेव्ह पार्टी प्रकरणात 250–300 पेक्षा अधिक महिलांना आमिष दाखवून फसवण्यात आले. या पार्टीदरम्यान मोबाईल आणि लॅपटॉपमधून अत्यंत अश्लील व्हिडीओ मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पीडित महिलांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. या सर्व तक्रारींच्या आधारे पुणे पोलिस आयुक्तांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रकरणाचा तपास केवळ वरवर न होता, सखोल व्हावा यासाठी एसआयटी गठीत करण्याची मागणी करण्यात आली आहे.




# टाकळीभान ग्रामसभेमध्ये दारूबंदीसाठी महिलांचा एल्गार; नवीन परमिट रूमला ना हरकत दाखला न देण्याची मागणी

बातमी जगत | प्रतिनिधी

✦ बाळासाहेब दुधाळे

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान ग्रामपंचायतमध्ये बुधवारी, १७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेमध्ये दारूबंदीच्या मुद्द्यावरून महिलांनी आक्रमक भूमिका घेतली. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या महिलांनी टाकळीभानचे सरपंच व ग्रामसेवक यांना निवेदन देऊन गावात दारूबंदी लागू करण्याची आणि कोणत्याही नवीन परमिट रूम किंवा दारूच्या परवान्यासाठी ग्रामपंचायतीने 'ना हरकत दाखला' (No Objection Certificate) देऊ नये, अशी मागणी केली. दारूमुळे कुटुंबं उद्ध्वस्त होत असल्याचा महिलांचा आरोप



निवेदनात महिलांनी गावातील दारूच्या वाढत्या व्यसनाधीनतेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. दारूमुळे अनेक तरुणांचे जीवन उद्ध्वस्त होत असून, कुटुंबांमध्ये वाद, कलह आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. व्यसनामुळे अनेक तरुण बेकार झाले आहेत आणि गुन्हेगारीकडे वळत आहेत, असे महिलांनी निवेदनात म्हटले आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेक कुटुंबप्रमुखांचा अकाली मृत्यू झाल्याने गावातील निराधार महिलांची संख्या वाढत आहे. तसेच, दारू पिऊन घरी येणारे तरुण आपल्या पत्नींना मारहाण करतात, ज्यामुळे महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या सर्व प्रकारांना आळा घालण्यासाठी तात्काळ दारूबंदी लागू करणे आवश्यक असल्याचे महिलांनी सांगितले.

ग्रामसभेतील इतर महत्त्वाचे विषय ग्रामसभेच्या सुरुवातीला ग्रामसेवक भिंगारदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेच्या विषयांची माहिती दिली. प्राचार्य जयकर मगर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' आणि 'मराठवाडा संग्राम मुक्ती दिन' यासंदर्भातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. ग्रामसभेत 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविणे, दुसऱ्या टप्प्यातील अपात्र घरकुले रद्द करणे, आणि १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा व स्वच्छता पंधरवडा अभियान' राबविणे यांसारख्या विषयांवरही चर्चा झाली. यावेळी श्रीरामपूर पंचायत समितीच्या माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांनी घरकुलांच्या नियमांविषयी मार्गदर्शन केले आणि टाकळीभानच्या सरपंचानी चांगले काम करून राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार मिळवावा, अशा शुभेच्छा दिल्या. महिलांनी दिलेल्या या निवेदनावर सौ. सुप्रिया धुमाळ, सौ. मंगल राऊत, अनिता तडके, सौ. वैशाली बोडखे, सौ. सोनाली बोडखे, सौ. प्रियंका बोडखे, सौ. सुरेखा कोकणे, सौ. वैशाली पटारे, सौ. स्वाती पटारे, सौ. अनिता पटारे, सौ. अंजली पटारे, सौ. मनीषा पटारे, श्रीमती आशाबाई बोडखे, सौ. शांताबाई राऊत यांच्यासह अनेक महिलांच्या सह्या आहेत.